**सं. फौ.ख.क्र. १४८/२०२१**
**सरकार वि. कृष्णदेव**
**निशाणी १९**

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.३ यांची साक्ष</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

**माझे नाव** :– स्वप्निल राजाराम बाड
**वय** :– ३४ वर्षे, **धंदा** :– शेती
**राहणार** :– विठलापूर, ता. आटपाडी, जि. सांगली

**<u>सरतपासणी अभियोगपक्षातर्फे – श्रीमती. ए. पी. केसकर, विद्यमान सहा. सरकारी वकील यांचेमार्फत</u>**

**०१.** दिनांक ०९/०२/२०२१ रोजी मी पंचनाम्यासाठी ढेंबरेवस्ती, विठलापूर येथे गेलो होतो. माझ्यासोबत दुसरा पंच विठ्ठल दादासो बाड हे होते. डंपर आणि दुचाकीचा अपघात झाला होता, त्याठिकाणचा पंचनामा करायचा होता. अपघात घडलेले ठिकाण कृषी सहाय्यक महेश कांतीलाल काळे यांनी दाखविले.

**०२.** अपघातस्थळी एक डंपर दक्षिणेकडून तोंड करुन उभा होता, तो डंपर मुरूम उतरवत असताना, विजेच्या तारेला स्पर्श होवून विजेची तार तुटलेली दिसली. त्या तुटलेल्या तारेला दिघंची कडून येणा–या दुचाकीस्वार धडकल्यामुळे अपघात झाला होता. डंपरमधील अर्धा मुरूम खाली टाकलेल्या अवस्थेमध्ये दिसून आला आणि एक व्यक्ती रस्त्यावर पडलेला दिसला. त्याचे रक्त पडलेले दिसले. घटनास्थळी मृत झालेल्या व्यक्तीची गाडी पडलेली दिसली. त्या गाडीचे हेडलाईट मोडलेली होती, त्याचा क्रमांक दिसत नव्हता. डंपरचा क्र.एम.एच.१२.एस.एफ.५७८३ असा होता.

**०३.** सकाळी ११.०० वाजता जाधव पोलीस पंचनामा करण्यासाठी आले होते. त्याठिकाणी पोलीस पाटील हजर होते. पंचनामा अंदाजे १.३० वाजेपर्यंत सुरू होता. आता मला नि.क्र.१८ वरील घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे.

**सं. फौ.ख.क्र. १४८/२०२१**
**सरकार वि. कृष्णदेव**
**निशाणी १९**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे – श्री. एस.व्ही.पाठक विद्यमान वकील यांच्यामार्फत सुरु</u>**

**०४.** हे म्हणणे खरे आहे की, मी गावच्या विकास सोसायटीचे चेअरमन आहे. साक्षीदार सांगतात की, त्यावेळी नव्हतो, आता आहे. हे म्हणणे खरे आहे की, गावातल्या शेतक–यांसाठी, कृषी योजनेसाठी कृषी खात्यात माझे जाणे–येणे असते. हे म्हणणे खरे आहे की, कृषी खात्यातील अधिकारी यांची माझी ओळख असते. हे म्हणणे खरे आहे की अपघाताची घटना मी प्रत्यक्ष पाहिलेली नाही.

**०५.** असे घडले नाही की, पोलिसांनी मला पंचनाम्याला येण्यासाठी नोटीस दिली होती. असे घडले नाही की, पोलिसांनी माझ्या समक्ष हेडलाईट फुटलेल्या काचा, रक्तमिश्रीत माती वगैरे असे घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की माझ्यासमक्ष पोलिसांनी गाडया ताब्यात घेतल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की डांबरी रस्त्याच्या पुर्वेला आणि पश्चिमेला कोणाचा गट क्रमांक आहे हे मला सांगता येणार नाही. असे घडले नाही की, त्या शेतजमिनीचा ७/१२ उतारा मी पोलिसांना दिलेला होता. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी पोलिस ठाण्यात तयार केलेल्या पंचनाम्यावर मी फक्त सही केली. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी तयार केलेल्या पंचनाम्यावर मी फक्त सही केली.

**०६.** हे म्हणणे खरे नाही की, कृषी खात्यातील अधिका–यांना मदत व्हावी म्हणून मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला. फेरतपास काही नाही.** श्रवणोत्तर स्विकृती,

समक्ष,

RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Digitally signed by RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Date: 2025.12.03 12:43:36 +0530

दि. ०३/१२/२०२५
आटपाडी.

( आर. बी. कुलकर्णी )
सह न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
आटपाडी